### श्वानदंश प्रतिबंधक लस (पोस्ट बाईट व्हॅक्सीन) केव्हा द्यावी ?

श्वान दंश झाल्यानंतर तात्काळ श्वानदंश प्रतिबंधक लस देऊन घ्यावी. लसीच्या पाच मात्रा श्वानदंश झालेल्या दिवसापासून ०,३,७,१४ व २८ व्या दिवशी देऊन घ्याव्यात.

### श्वानदंश झाल्यानंतरचे (पोस्ट एक्सपोजर) लसीकरण कोणास करावे ?

- पिसाळलेला किंवा अनोळखी किंवा भटका पाळीव श्वान चावल्यास.
- जखमेत किंवा श्लेष्मल आवरण किंवा डोळ्यास पिसाळलेल्या श्वानाच्या लाळीचा संपर्क झाल्यास.
- रोगप्रतिबंधक लस दिलेल्या श्वानास जर पिसाळलेला श्वान चावला तरी सुद्धा संभाव्य धोका टाळण्यासाठी लसीकरणाचा पूर्ण कोर्स करणे कधी ही चांगले.
- रोगप्रतिबंधक लस न दिलेला, परंतु सर्वसामान्य दिसणारा एखादा श्वान चावला तरी सुद्धा लसीकरण करणे उचित असते. कारण वरवर सर्वसामान्य दिसणाऱ्या एखाद्या श्वानाच्या लाळेतहि रेबीजचे विषाणू असू शकतात.

### श्वानांना रेबीज होवू नये म्हणून काय करावे ?

- श्वानांचे नियमित लसीकरण हाच रेबीज रोग प्रतिबंधासाठी प्रभावी उपाय आहे.
- सर्व श्वानांना वयाचे ३ महिने झाल्यावर रेबीज प्रतिबंधक लसीची त्वचेखाली पहिली मात्रा द्यावी. तदनंतर नियमितपणे दरवर्षी लस टोचून घ्यावी.
- रोगप्रवण भागात ७०% श्वानांचे लसीकरण केले तर रोग चक्र थांबवता येते.

### रेबीज प्रतिबंधक लस कोणत्या व्यक्तींनी घ्यावी ?

- उच्च जोखमीच्या व्यावसायिक गटातील व्यक्ती जसे की पशुवैद्यक आणि प्राणी हाताळणारे त्यांचे कर्मचारी, रेबीज संशोधक आणि काही प्रयोगशाळा कामगार, मांजरी, श्वान इत्यादींच्या संपर्कात असलेल्या व्यक्ती.
- प्रथम वेळी ०, ७ व २१/२८ व्या दिवशी अशा तीन मात्रा घ्याव्यात. तद्नंतर दरवर्षी बुस्टर डोस घ्यावा.

### जनावरांचे दूध किंवा दुग्धजन्य पदार्थाद्वारे रेबीज संक्रमित होतो का ?

रेबीज या रोगाचे विषाणू दुधात येत नाहीत तथापि, रेबीजग्रस्त प्राण्यांच्या दुधाचे सेवन करणे योग्य नाही. उकळलेल्या दुधात रेबीजचे विषाणु जिवंत राहत नाहीत. त्यामुळे नेहमी दुध उकळून प्यावे.

### रेबीज संक्रमित प्राण्यांच्या मांसाचे सेवन करू शकतो का ?

संक्रमित प्राण्याचे कच्चे मांस खाल्यास लसीकरण (पोस्ट एक्सपोजर) आवश्यक आहे. शिजवलेले मांस रेबीज संक्रमित करत नाही. तथापि, रेबीज संक्रमित प्राण्यांचे मांस खाणे योग्य नाही.

### मनुष्यातील श्वानदंश कसा टाळावा ?

श्वान दंश टाळला तर रेबीज टाळता येतो म्हणून खालील बाबींकडे लक्ष द्यावे.

- सावध रहावे, आणि भटक्या श्वानाशी जबाबदारीने वागावे.
- रेबीज झालेल्या श्वानाला कसे ओळखावे ते शिकावे.
- श्वानांच्या शरीराची भाषा जाणून घ्यावी, श्वानासामोरून अचानक पळू नये, किंचाळू नये किंवा श्वानांवर काहीही फेकू नये.
- झोपलेल्या, खाणाऱ्या किंवा पिल्लांची काळजी घेणाऱ्या मादी श्वानास त्रास देऊ नये.
- गुरगुरणारा श्वान जवळ आल्यावर आपण पळून जाऊ नये. त्याऐवजी–स्थिर उभे रहावे. आपले हात खाली ठेवावेत, हात आपल्या शरीराच्या जवळ ठेवावे, जमिनीकडे पहावे, श्वानाशी थेट नजर टाळावी.

### रेबीज टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थानी काय करावे ?

- श्वानांचे सक्तीने नोंदणीकरण करावे.
- मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण आणणेसाठी 'ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोग्राम' राबवावा.
- मोकाट श्वानांसाठी लसीकरण मोहीम राबवावी.
- रेबीजने मृत्य पावलेल्या प्राण्यांची योग्य विल्हेवाट लावावी.


**प्रा. डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**डॉ. रविंद्र जाधव**
सहाय्यक प्राध्यापक
चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर



मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/३/२०२५


रौप्य महोत्सव 2000 2025

# रेबीजमुळे शुन्य मृत्यु–हो आपण करू शकतो




प्रकाशक
विस्तार शिक्षण संचालनालय
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ**
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – ४४०००१
टोल फ्री क्रमांक – १८००–२३३–३२६८
संकेतस्थळ – www.mafsu.ac.in

## प्रस्तावना

रेबीज हा विषाणूजन्य प्राणघातक आजार उष्णरक्त असलेल्या सर्व प्राण्यांमध्ये आढळून येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार जगभरात दरवर्षी सुमारे ५९,००० लोकांचा तर भारतात जवळपास ३६ टक्के म्हणजे २०,००० लोकांचा या आजाराने मृत्यू होतो. श्वानदंश होण्याचे प्रमाण १५ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये जास्त म्हणजे ४० टक्के आहे. ही महाभयंकर आकडेवारी पाहता लक्षात येते की, हा रोग सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे रोगाविषयी मोठया प्रमाणावर जनजागृती होणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ विविध शासकीय विभागांच्या व स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने रेबीज जनजागरण मोहीम राबवत आहे.

## रेबीज आजार कोणत्या जंतुमुळे होतो? त्याची वैशिष्ट काय आहेत?

- रेबीज हा रोग 'रॅबडो व्हायरस' या बुलेट सारख्या विषाणूमुळे होतो.
- या विषाणूंना चेतापेशीचे व लाळग्रंथीचे आकर्षण असते. विषाणू तुलनेने नाजूक आणि आयोडीन, एसीटोन, साबण, डिटर्जंट, इथर, फॉर्मेलिन, फिनॉल ई. जंतुनाशकांसाठी संवेदनशील आहेत.
- रेबीज विषाणू सुकलेल्या लाळेत काही तासांत तर ५० डिग्री सेल्सियस मध्ये १ तासात आणि ६० डिग्री सेल्सियसवर ५ मिनिटात नष्ट होतात. विषाणू शरीराबाहेर जास्त काळ टिकत नाहीत.
- हा विषाणू थंड प्रतिरोधक असतो आणि -७० डिग्री सेल्सियस तापमानात अनेक वर्षे टिकतो.

## रेबीज आजार कोणत्या प्राण्यांना होतो ?

- रेबीज हा विषाणूजन्य आजार गरम रक्त असणाऱ्या मानवासह सर्व प्राण्यांमध्ये होतो तर श्वान (कुत्रा) व कोल्हे अधिक संवेदनक्षम आहेत. त्याचप्रमाणे हा आजार मांजर, गाई-म्हशी, शेळ्या-मेंढ्या यानाही होतो.
- रोगाचे प्रमाण मादीपेक्षा नर श्वानांत अधिक असल्याचे दिसून आले आहे. तसेच हा रोग मादीत प्रामुख्याने माजावर येण्याच्या कालावधीत अधिक प्रमाणात होत असल्याचे आढळून आलेले आहे.

## रेबीज आजाराचे संक्रमण स्त्रोत कोणते ?

- रेबीज आजाराने संक्रमित श्वान आणि किरकोळ प्रमाणात मांजर हे पाळीव प्राण्यांमध्ये व मानवामध्ये रेबीज आजाराच्या संक्रमणास कारणीभूत ठरतात.

## प्राणी व मानवामध्ये रेबीज आजाराची लागण कशी होते?

- रेबीज आजाराची लागण मुख्यत्वे: बाधित प्राण्यांच्या चाव्यातून आणि ताज्या लाळेच्या संपर्कात त्वचेच्या जखमा किंवा श्लेष्मल आवरण दुषित झाल्याने होते.
- रेबीज (पिसाळणे) या रोगाचा प्रसार प्रामुख्याने भटक्या किंवा मोकाट श्वानांद्वारे होतो. रोग बाधित श्वान, मांजर, पाळीव प्राणी (गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, घोडे), जंगली जनावरे (कोल्हा, लांडगा ई.), वटवाघुळ रोग प्रसारास कारणीभूत ठरतात.
- सर्वसामान्यपणे ९९% मानवी रेबीज बाधित श्वानांच्या चाव्यातून होतो.

## श्वानदंश झाल्यानंतर लक्षणे किती दिवसात दिसतात ?

- रेबीज बाधित श्वान / मांजर चावल्यानंतर सर्वसाधारणतः २० ते ३० दिवसात रोगाची लक्षणे दिसतात. डोक्याच्याजवळ चावा घेतला असेल तर रोगाची लक्षणे लवकर दिसतात. याउलट जर पायाकडील भागात चावा घेतला असेल तर लक्षणे उशिरा दिसतात.
- एका ठिकाणी चावा घेतल्यापेक्षा दोन-तीन ठिकाणी चावा घेतलेल्या जनावरांत रोगाची लक्षणे लवकर दिसून येतात.

## श्वानांतील रेबीज आजाराची प्रमुख लक्षणे कोणती ?

सतत व भरपूर लाळ गळणे, मालकास न ओळखणे/आदेश न पाळणे, चावा घेण्याची प्रवृत्ती वाढणे, भूकंणे- प्रथम घोगरा आवाज येणे व नंतर आवाज बंद होणे, अंधा-या खोलीत जावून कोप-यात / पलंगाखाली लपून बसणे, पाणी न पिणे, पाण्याची भिती निर्माण होणे, तोडांचा खालचा जबडा लुळा पडणे, जीभ बाहेर येणे व ३-७ दिवसात दगावणे.

## गायी-म्हशीमध्ये रेबीज झाल्याचे ओळखावे कसे ?

बाधित गायी-म्हशी आक्रमक होतात व माणसावर धावून जातात. शिंगे व डोके झाडावर किंवा भिंतीवर घासतात, सारखे हंबरतात व त्यांचा आवाज घोघरा होतो. तोंडातून भरपूर लाळ गळत राहते, डोळे लालबुंद होतात, जनावर वारंवार लघवी करतात व शेन टाकतात, चारा-पाणी बंद करतात व २-३ दिवसांत दगावतात.



## मनुष्यामध्ये रेबीजची कोणती लक्षणे दिसतात ?

तीव्र डोकेदुखी, थकवा, अस्वस्थता, निद्रानाश आणि स्थानिक वेदना, अतिसंवेदनशीलता, विचित्र वर्तन, ओकारी आल्यासारखी वाटणे, नाका-डोळ्यातून पाणी वाहने / गळणे, घशाला कोरड पडणे, खाणे- पिणे बंद होणे, पाण्याची भिती (हायड्रोफोबीया) वाटणे आणि शरीरभर लुळेपणा येऊन साधारणत: ७ दिवसात मृत्यू येणे.

## श्वानदंश झाल्यानंतर काय उपाययोजना करावी ?

रेबीज रोग झाल्यावर कसल्याही स्वरूपाचा उपचार उपलब्ध नाही, परंतु श्वानदंश झाल्यानंतर जखमेची योग्य काळजी घेतली व श्वानदंश प्रतिबंधक लस (पोस्ट बाईट व्हॅक्सीन) दिली तर या प्राणघातक रोगापासून बचाव करता येतो. चावा घेतलेली जखम त्वरित कमीतकमी १५ मिनिटे साबण व भरपूर पाणी वापरून स्वच्छ करावी. तदनंतर अल्कोहोल किंवा पोव्हीडोन आयोडीन सारखे जंतुनाशक लावावे. जखमेस टाके घालू नयेत तसेच पट्टी बांधू नये.